महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission
मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५
ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

क्रमांक :- पीडब्ल्यूडी-४२१८/सीआर-२४/२०१८/तीन दिनांक :- २१ जानेवारी, २०१९

# घोषणा

**विषय:- राज्य सेवा पूर्व परीक्षा-२०१९**
दिव्यांग उमेदवारांना परीक्षेच्या वेळी लेखनिकाची मदत व/किंवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय ठरविण्याबाबत.

आयोगामार्फत आयोजित परीक्षांकरीता परीक्षेच्या वेळी दिव्यांग उमेदवारांना लेखनिकाची मदत घेण्याची परवानगी आणि/अथवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय ठरविण्यासंबंधी आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक १ मार्च, २०१८ रोजी 'दिव्यांग उमेदवारांना लेखनिक पुरविण्याबाबत व अनुग्रह कालावधीबाबत मार्गदर्शक सूचना' उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनांनुसार विहित नमुन्यामध्ये (प्रपत्र-१) आवश्यक सर्व कागदपत्रांसह अर्ज करुन आयोगाची पूर्व परवानगी घेतलेल्या उमेदवारांनाच परीक्षेच्या वेळी लेखनिक व/किंवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय राहील, असे आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक ६ मार्च, २०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या घोषणेद्वारे स्पष्ट करण्यात आले आले आहे.

**२.** आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक ६ जुलै, २०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या घोषणेनुसार तसेच, विषयांकित राज्य सेवा पूर्व परीक्षा-२०१९ करीता दिनांक १० डिसेंबर, २०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीमधील परिच्छेद क्रमांक ५ मध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार प्रस्तुत परीक्षेकरीता लेखनिकाची मदत घेण्याची परवानगी आणि/अथवा अनुग्रह कालावधी घेण्याकरीता दिव्यांग उमेदवारांनी लेखनिक पुरविण्याबाबत व अनुग्रह कालावधीबाबत मार्गदर्शक सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करुन विहित नमुन्यामध्ये (प्रपत्र-१) आवश्यक सर्व कागदपत्रांसह अर्ज सादर करुन आयोगाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. तथापि, प्रस्तुत परीक्षेकरीता अनेक दिव्यांग उमेदवारांनी लेखनिकाची मदत घेण्याची परवानगी आणि/अथवा अनुग्रह कालावधी घेण्याकरीता आयोगाकडे विहित नमुन्यामध्ये (प्रपत्र-१) लेखी अर्ज सादर करुन विनंती केलेली नाही. लेखनिकाची मदत घेण्याची परवानगी आणि/अथवा अनुग्रह कालावधीकरीता पात्र दिव्यांग उमेदवारांनी सदर जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करताना केलेल्या दिव्यांगत्वाच्या दाव्याव्यतिरिक्त आयोगाच्या उपरोक्त सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करुन विहित नमुन्यामध्ये (प्रपत्र-१) आवश्यक सर्व कागदपत्रांसह **दिनांक २८ जानेवारी, २०१९ पर्यंत** desk3.mpsc@maharashtra.gov.in या ईमेल आयडीवर अथवा टपालाद्वारे लेखी विनंती करुन आयोगाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. अन्यथा, परीक्षेच्या वेळी लेखनिकाची मदत घेण्याची आणि/अथवा अनुग्रह कालावधीची परवानगी देणे शक्य होणार नाही.

**३.** आयोगाच्या उपरोक्त दिनांक १ मार्च, २०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार दिव्यांग उमेदवारांनी लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीकरीता विनंती अर्ज सादर करताना खालील कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे:-

(१) प्रपत्र-१ (दिव्यांग व्यक्तीसाठी लेखनिक व/किंवा अनुग्रह कालावधी मिळण्याबाबत विनंती अर्ज)

(२) प्रपत्र-२ (Certificate of Disability in Dominant (Writing) Extremity) (**फक्त छायांकित प्रत**)

(३) ऑनलाईन प्रणालीद्वारे वितरित करण्यात आलेले विहित नमून्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र (**फक्त छायांकित प्रत**)

(४) लेखनिकाच्या आधार कार्डची छायांकित प्रत (लागू असल्यास)

**४.** उपरोक्त संबंधित सर्व कागदपत्रांसह विहित नमुन्यामध्ये अर्ज सादर केलेल्या व आयोगामार्फत लेखनिकाची मदत घेण्याची आणि/अथवा अनुग्रह कालावधीची परवानगी देण्यात आलेल्या उमेदवारांची नावे परीक्षेपूर्वी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. ज्या उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह विहित नमुन्यामध्ये अर्ज सादर करुनही त्यांचे नाव प्रस्तुत यादीमध्ये नमूद नसल्यास त्यांनी परीक्षेपूर्वीच आयोगाच्या कार्यालयाशी संपर्क साधणे आवश्यक राहील. याबाबत परीक्षेनंतर आलेल्या तक्रारींची कोणत्याही परिस्थितीत दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण:- मुंबई

उपसचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग